


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : ४६ वा बुधवार दि. १९ मार्च २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# मी वक्तव्यावर ठाम, माफी मागणार नाही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांचं स्पष्टीकरण...

## फडणवीसांची औरंगजेबाशी केली होती तुलना...

**जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाच्या कबरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काही दिवसांपूर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची औरंगजेबाशी तुलना करणारे विधान केलं होतं. ङ्खऔरंगजेब क्रूर शासक होता, आज देवेंद्र फडणवीसही तेवढेच क्रूर आहेतफ, असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं होतं. त्यांच्या या विधानानंतर त्यांच्यावर टीकेची झोड उठली होती. यानंतर आता हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या विधानावर स्पष्टीकरण देत आपण वक्तव्यावर ठाम असून माफी मागणार नसल्याचं म्हटलं आहे. मी महायुती सरकारच्या कारभाराची तुलना औरंगजेबाच्या कारभाराशी केली. त्याचा मोठा संदर्भ आहे. मी असाच संदर्भ देऊन बीडमध्ये देखील बोललो होतो. आता या विषयाच्या संदर्भात भाजपाचे नेते आणि त्यांचे मित्रपक्ष त्यांना औरंगजेब म्हणण्यात का गुंतले आहेत? हे मला काही समजत नाही. औरंगजेब क्रूर होता, हेच माझं म्हणणं होतं आणि मी देखील तेच म्हटलं होतं. यात औरंगजेबाच्या उदात्तीकरणाचा काही विषय नाहीफ, असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. मी जे विधान केलं ते विधान राज्यकारभाराच्या अनुषंगाने होतं. औरंगजेब ज्या क्रूर पद्धतीने राज्यकारभार चालवत होता, त्याच पद्धतीने देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा कारभार चालला आहे, असं विधान केलं होतं. त्या विधानावर मी अद्यापही ठाम आहे. जसं औरंगजेबाने जिझिया कर लावला होता, तसाच कर आता महाराष्ट्रातील सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस लावत आहेत




शाळेच्या वह्या, पुस्तकावर कर लावला, स्मशान भूमीतील लाकडांवरही कर लावला आहे. त्यामुळे ही सर्व कार्यप्रणाली त्याच प्रकारची आहेफ, असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले आहेत.

---

# पोलिसांच्या खांद्यावर बंदूक ! शेतकऱ्यांवर गोळ्या घालण्याचे सरकारचे धोरण

## शांततेत सत्याग्रह करू द्यायचा नसेल तर गोळ्या घाला - रविकांत तुपकर

**जनसंचलन/बुलढाणा**

कर्जाचा बोजा असलेले सातबारा अरबीसमुद्रात बुडवण्यासाठी निघालेल्या क्रांतिकारी संघटनेच्या शेतकऱ्यांना पोलिसांनी मुंबईच्या वेशीवर डांबून ठेवले आहे. दरम्यान गनिमी पद्धतीने भूमिगत झालेले रविकांत तुपकर मुंबईत अचानक प्रकट झाले. यावेळी ते म्हणाले की, कार्यकर्त्यांना अटक केली म्हणून आंदोलन थांबणार नाही. घरच्या भाकरी बांधून, पोलिसांना चकवा देत शेकडो किलोमीटर प्रवास करून आम्ही येथे आलो आहोत. माघारी फिरणार नाहीत आणि थांबणारही नाहीत. पोलिसांना विनंती आहे, आम्हाला शांततेत आणि संवेदनशील मार्गाने आंदोलन करू द्या... आंदोलन करू द्यायचे नसेल तर आम्हाला गोळ्या घाला. आत्महत्या करून मारण्यापेक्षा सरकार आणि पोलिसांच्या गोळ्यांनी मेलो तर शाहिद तरी होऊ. पण लक्षात ठेवा पोलिसांकरावी सरकारने आमचे जगणे मुश्किल केले तर आम्ही देखील तुमचे जगणे मुशकील करू. आम्ही पिकवतो म्हणून तुम्ही खाता. यामुळेच बापाच्या घामाच्या दामासाठी लढत आहोत. पोलिसांनी अडवा अडवी करू नये. तुम्ही देखील आमचे भाऊ आहात. तुमचा आम्ही सन्मानच करतो. शांतता आणि संवैधानिक मार्गाने आम्हाला आंदोलन करू द्या, म्हणत रविकांत तुपकर क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्ते मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. आम्हाला भीक अथवा उपकार नको, आम्ही आमच्या बापाच्या घामाचा दाम मागत आहोत शेतकऱ्यांचे प्रश्न आणि तरुणांच्या हाताला रोजगार देण्याच्या मुद्यावर सरकार अधिवेशनात चर्चा का करत नाही? शेतकऱ्यांना भिकेला लावून सरकार अंबानी- अदानीच्या श्रीमंतीचे मनोऱ्यावर मनोरे चढवित आहे. शेतकरी आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नावरून लक्ष हटवण्यासाठी कबरीच्या मुद्द्यावर सत्ताधारी बोलत आहेत. सरकारने निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार शेतकऱ्यांचा संपूर्ण सातबारा कोरा करावा, कापूस व सोयाबीनला प्रतिक्विंटल तीन हजार रुपये भाव फरक द्यावा, कांदा, दूध,



धान उत्पादक करायला अनुदान द्यावे, ऊसाला एफआरपी प्रमाणे एक रकमी मोबदला व शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा, कल्याण रेल्वे मार्गामुळे विस्थापित झालेल्या झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करावे!

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# केवळ ४० गुणांचा विषय म्हणून दुर्लक्षित ठेऊ नका!

## संपादकीय लेख

अलीकडे भूगोल विषयाचे महत्त्व सर्वच संबंधितांना कळेनासे झाले आहे. शालेय पातळीवर तर सर्वच संबंधित मंडळी केवळ ४० गुणांचा विषय म्हणून त्याकडे दुर्लक्षित करतात. फक्त इंग्रजी, विज्ञान व गणित हेच जणू शालेय विषय असल्याचे मानून सामाजिक शास्त्रांकडे अक्षम्य दुर्लक्ष करतात. खरं म्हणजे विकासाच्या कोणत्याही समस्येमध्ये स्थानिक भूगोलाचे ज्ञान महत्त्वाचे असते. गाव आणि पंचक्रोशीचा भूगोलदेखील स्थानिक समस्या सोडविण्यास उपयोगी ठरतो. मात्र शासनाने फारसा विचार न करता ङ्कङ्कजिल्हा - भूगोलङ्कङ्क ही संकल्पनाच सोडून दिली, असे इयत्ता तिसरीच्या अभ्यासक्रमावरून लक्षात येते. असा श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा संकलित लेख वाचनीयच... संपादक सोळाव्या व सतराव्या शतकांमध्ये क्रिस्तोफर कोलंबस, मार्को पोलो व जेम्स कूक यांनी पुष्कळ नवीन प्रदेशांचा शोध लावला. त्यांच्या अनुभवांवरून काही नकाशे नव्याने तयार करण्यात आले. अठराव्या व एकोणिसाव्या शतकांमध्ये भूगोलाला वेगळ्या अध्ययनशास्त्राचा दर्जा प्राप्त होऊन युरोपमधील प्रमुख विश्वविद्यालयांमध्ये भूगोलाचे अध्ययन होऊ लागले. यात प्रामुख्याने पॅरिस व बर्लिन विश्वविद्यालयांचा समावेश होता. अठराव्या शतकामध्ये भूगोलाच्या अभ्यासाकरिता अनेक भौगोलिक संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यात १८२१ साली स्थापन झालेली सोसायटी दी जिओग्रॉफी, सन १८३० साली स्थापन झालेली रॉयल जियोग्राफिकल सोसायटी, सन १८४५ साली स्थापन झालेली रशियन जियोग्राफिकल सोसायटी, सन १८८८ साली स्थापन झालेली नॅशनल जियोग्राफिक सोसायटी यांचा प्रामुख्याने समावेश होता. भूगोलाचा तत्त्वज्ञानाच्या शाखेपेक्षा विज्ञानाच्या शाखेशी संबध जोडण्यासाठी रिम्युल कान्ट, अलेक्झांडर वोन हुम्बोल्ट, कार्ल रिटर आणि पॉल विडाल डीला ब्लँचे यांनी योगदान दिले.

गेल्या दोन शतकांमध्ये संगणकाच्या नवशोधामुळे भूगोलाच्या अध्ययनात जियोमॅटिक्स आणि इतर संबंधित पद्धतींचा वापर प्रभावीपणे होत आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये विसाव्या शतकापासून पर्यावरणीय सिद्धान्त, प्रादेशिक भूगोल, परिणामीय क्रांती- आंकड्याच्या साहाय्याने परिणाम-निश्चिती, समालोचनात्मक भूगोल अशा विविध मार्गांनी भूगोलाचे अध्ययन होत आहे. भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, जनसंख्याअध्ययनशास्त्र यांचा भूगोलाशी घनिष्ट असा आंतरसंबध आहे. यामुळे भूशास्त्राचे सर्वांगाने अध्ययन होण्यास मदत होत आहे.

भूगोल दिनाचे कर्मकांड- मकरसंक्रांतीला मुलांना शाळेत तिळगूळ वाटला जातो. मात्र भूगोल दिनाबद्दल गोल दिला जातो- काहीही माहिती दिली जात नाही. ऋतुबदल होण्याचा हा दिवस भूगोलात महत्त्वाचा आहे. म्हणून याच दिवशी भूगोल दिन साजरा करण्याचे ठरले. शालेय पातळीवर मात्र भूगोल विषयाची अक्षम्य उपेक्षा सुरू आहे... हेच दुर्दैव आपले! गेली तीस वर्षे १४ जानेवारी हा भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. विषयानुरूप दिन पाळण्याची एक परंपरा महाराष्ट्रात रुजू झाली आहे. मराठी दिन- २७ फेब्रुवारी, विज्ञान दिन-२८ फेब्रुवारी, तर संस्कृत दिन- आषाढस्य प्रथम दिवसे इत्यादी. त्याप्रमाणे अत्यंत महत्त्वाचा पण दुर्लक्षित असा विषय म्हणजे भूगोल. देशाच्या पातळीवरील भूगोल विषयतज्ज्ञ प्रोफेसर चं.धुं. ऊर्फ सी.डी.देशपांडे यांचा अमृतमहोत्सवी सत्कार सन १९८६मध्ये पुणे येथे पं.भीमसेन जोशी यांच्या हस्ते झाला होता. पुण्यातील पत्रकार, लेखक डॉ.सुरेश गरसोळे यांनी तो घडवून आणला होता. तेव्हापासून मकरसंक्रांतीच्या दिवशी डॉ. देशपांडे यांचा जन्मदिन महाराष्ट्रभर भूगोल दिन म्हणून विशेषतः शालेय पातळीवर फक्त नावालाच सुरू आहे. मकरसंक्रांतीला मुलांना शाळेत तिळगूळ वाटला जातो. ऋतुबदल होण्याचा हा दिवस भूगोलात महत्त्वाचा आहे. म्हणून याच दिवशी भूगोल दिन साजरा करण्याचे ठरले. त्यानुसार भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचे उपक्रम निवडले जावेत. व्याख्याने, ध्वनिफिती दाखवून भौगोलिक घटकांचे महत्त्व सांगणे, भौगोलिक सहली, नकाशे व इतर भौगोलिक साहित्याची प्रदर्शने, भौगोलिक विषयावर निबंध लिहिणे, इतर विषयांशी असलेला भूगोलाचा सहसंबंध असे अनेक उपक्रम घेतले जावेत, असे अभिप्रेत आहे. वर्षांतून एकदा तरी या विषयावर लक्ष केंद्रित व्हावे, या उद्देशाने अनेक उपक्रम घेतले जावेत, हे अपेक्षित असते.

अलीकडे भूगोल विषयाचे महत्त्व सर्वच संबंधितांना कळेनासे झाले आहे. शालेय पातळीवर तर सर्वच संबंधित मंडळी केवळ ४० गुणांचा विषय म्हणून त्याकडे दुर्लक्षित करतात. फक्त इंग्रजी, विज्ञान व गणित हेच जणू शालेय विषय असल्याचे मानून सामाजिक शास्त्रांकडे अक्षम्य दुर्लक्ष करतात. खरं म्हणजे विकासाच्या कोणत्याही समस्येमध्ये स्थानिक भूगोलाचे ज्ञान महत्त्वाचे असते. गाव आणि पंचक्रोशीचा भूगोलदेखील स्थानिक समस्या सोडविण्यास उपयोगी ठरतो. मात्र शासनाने फारसा विचार न करता ङ्कङ्कजिल्हा - भूगोलङ्कङ्क ही संकल्पनाच सोडून दिली, असे इयत्ता तिसरीच्या अभ्यासक्रमावरून लक्षात येते. एकूणच अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके, विद्यार्थ्यांसाठी कृती-पुस्तिका, शिक्षकांसाठी तयार केलेल्या हस्तपुस्तिका, शिक्षकांचे प्रबोधन, विषयातील नवनवीन संकल्पना व संज्ञा त्याचबरोबर संदर्भ पुस्तके या सर्वच बाबतीत निदान भूगोल विषयाबाबत अत्यंत उदासीनता निर्माण झालेली आहे. ही उदासीन वृत्ती एवढ्या टोकाला गेलेली आढळते की पाठ्यपुस्तके कशीही असोत, जड व बोजड असोत, असंख्य चुकांनी भरलेली असोत, त्यातील नकाशांचे स्वरूप कितीही चुकीचे व क्लिष्ट असो, वर्षानुवर्षे अशी पुस्तके तशीच शिकविली जातात! अध्यापकांनाही विषय-ज्ञान नसते, पदवीला विषय एक व अध्यापन दुसऱ्याच विषयाचे! असा प्रकार असल्यावर त्यांना आत्मविश्वास कसा वाटणार? याउलट विषयज्ञान पक्के असेल तर विषय अध्यापनाच्या विविध पद्धती- मॉडेल्स हाताळता येतील. पण प्रत्यक्षात शिक्षकांचे जाऊ द्या, तर डिटी.एड् किंवा बी.एड्ला जे मेथड-मास्टर्स असतात त्यांचाही पदवीला भूगोल विषय नसतो! तरीही असे बहाद्दर अध्यापक भूगोल विषय कसा शिकवावा? यावर खोट्या आत्मविश्वासाने शिकवित असतात! त्यांच्यासाठी तर ज्ञानरचनावाद ही सध्याची कळीची संकल्पना ङ्कङ्ककोसों दूर है!ङ्कङ्क अगदी खरं सांगायचं तर बालभारती व राज्य शिक्षण मंडळामधली तथाकथित तज्ज्ञ लेखकमंडळी पाठ्यपुस्तके तयार करताना केवळ पाट्या टाकण्याचे काम करीत असतील व असंख्य चुका करीत असतील तर एकूणच आपल्या राज्यात भूगोल विषयाचे अध्यापन केवळ ङ्कदिनफसाजरे करून कसे सुधारणार? शेवटी दीनच राहणार.

तज्ज्ञांच्या उद्विग्नतेची प्रमुख कारणे- राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे एप्रिल २०१३ मध्ये प्रकाशित झालेले १०वीचे भूगोलाचे पाठ्यपुस्तक, हे पुस्तक महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी कसे घातक व भयानक आहे, हे स्पष्ट करूनही मंडळ त्यावर जून २०१८ पासून कार्यवाही करून बदल करणार. इयत्ता तिसरीपासून बारावीपर्यंत एकाही पाठ्यपुस्तकात भारतात पर्जन्यमानाचे वितरण दाखविणारा नकाशा अंतर्भूत केलेला नाही. चुका करणारे मंडळ पूर्वीच्या सरकारने बरखास्त केल्यावर विद्यमान सरकारने पुन्हा त्यातील कथित तज्ज्ञांना नवीन समितीवर घेतले आहे. विधानसभेत एकूण ४८ आमदार जोशात उभे राहिले व दहावीच्या पुस्तकाचा निषेध करून विविध शिक्षा सुनावीत होते. ते सर्व विरोधी पक्षातील आमदार आता स्वस्थ आहेत, कारण आता त्यांचे राज्य आले आहे. महाराष्ट्राच्या लोहमार्ग दाखविणाऱ्या नकाशात शिर्डी व उस्मानाबाद स्थानकांचा पत्ता नाही, तरीही तेथील आमदार काहीच कसे बोलत नाहीत? अशा १०० चुका दाखविल्यावरही शालेय शिक्षणखाते गप्प आहे. कशाला करावा साजरा भूगोल दिन? त्यापेक्षा श्राद्ध घालावा, असे वाटते. अशी भूगोल विषयाची बेइज्जतीच भूगोल दिनास मारक आहे, हे आधी ध्यानी घ्यावे लागेल.

# हम सुधरेंगे नही! रोड रोमियोंने केला अल्पवयीन मुलीचा पाठलाग...!

**जनसंचलन/ शेगाव**

महिला सुरक्षिततेचा मुद्दा एरणीवर आला असताना, जिल्ह्यात एक ना एक घटना महिला सुरक्षिततेचा अभाव अधोरेखित करीत आहे.मात्र पोलीस यंत्रणेला त्याचे सोयरे सुतक दिसून येत नाही. शेगावात परीक्षेला जाण्यासाठी निघालेल्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून लगट साधण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका आरोपीवर पोलिसांनी पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर अल्पवयीन मुलगी शेगाव येथे परीक्षा देण्यासाठी घरून गेली होती.सकाळी दहा वाजता ती शेगावला पोहोचली.दरम्यान बारा वाजेपर्यंत निंबा येथील घरी परत येण्यासाठी बसस्थानकावर येईपर्यंत आरोपी सय्यद अमर सय्यद जावेद (२०) राहणार निंबा तालुका बाळापूर याने पायदळ चालत सदर मुलीचा पाठलाग केला.मुलीने मागे वळून पाहिले असता आरोपी सतत तिच्याकडे बघत होता त्यामुळे त्याला घाबरून तिने शेगाव बस स्थानकावर ड्युटीला असलेल्या पोलिसाला याबाबत माहिती कथन केली असता पोलिसांनी आरोपी सय्यद अमर सय्यद जावेदला ताब्यात घेतले. काही दिवसांपासून शाळा परिसरारत शाळा, सुटण्याच्या व भरण्याच्या वेळेत रोडरोमियोचा सुळसुळाट वाढला असल्याने विद्यार्थ्यांसह पालक धास्तावले आहे .. शिट्या वाजवणे , मोटरसायकलीचे हॉर्न वाजवणे , अश्लील हावभाव करणे मुलींची छेड काढणे असे प्रकार करून राजरोसपणे या रोमियोंचे सुरू आहेत यामुळे विद्यार्थिनींमध्ये असुरक्षिततेचे व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबतच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेता शाळा परिसरात पोलिस गस्त वाढवून सदर रोमियोंचा बंदोबस्त करावा, अशी मागणी समस्त पालकवर्गाकडून करण्यात येत आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कबर उद्ध्वस्त करा, सोहळ्याला ते दोघे प्रमुख पाहुणे हवेत; ठाकरेंचा भाजपला सणसणीत टोला...



**मुंबई:** नागपुरात दंगल पेटते आणि ती पूर्वनियोजित असल्याचं सांगितलं जातं. दंगल पूर्वनियोजित होती. मग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे असलेलं गृह खातं काय झोपा काढत होतं का, असा सवाल शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी विचारला. ते विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान माध्यमांशी बोलत होते. नागपुरात काल उसळलेल्या हिंसाचारावरुन त्यांना सरकारचे वाभाडे काढले. गुजरातमध्ये जन्माला आलेल्या औरंगजेबाशी छत्रपती शिवाजी महाराजांनी संघर्ष केला. त्याच्या सत्तेला नमवून त्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केलं. त्यावर औरंगजेब चालून आला होता. औरंगजेब महाराष्ट्राच्या मातीचा एक कणही जिंकू शकला नाही. महाराजांपासून स्फूर्ती घेतलेल्या संभाजी महाराज, राजाराम महाराज, ताराराणी आणि असंख्य मावळ्यांनी त्याला याच महाराष्ट्रात मूठमाती दिली. अशा औरंगजेबाचं समर्थन कोणीही शिवप्रेमी करणार नाही. त्याचं थगडं उकरण्याची केवळ भाषा करण्यापेक्षा कृती करा. डबल इंजिन सरकार फक्त वाफा सोडतंय का?, असा खोचक टोला ठाकरेंनी लगावला.मुख्यमंत्रांनी ही कबर उखडण्यात असमर्थतता दाखवलेली आहे. त्या कबरीला केंद्राचं संरक्षण आहे. म्हणजे केंद्र सरकार जर त्या थडग्याला संरक्षण देणार असेल तर आम्ही भाजपला विचारतो की तो औरंगजेब तुमचा कोण लागतो? औरंगजेब असो वा अफजलखान असो, हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे पुरावे आहेत. ते पुरावे हटवायचे असतील, तर आंदोलनं काय करता? सरकारकडे जा, मोदींकडे जा आणि त्यांना सांगा, गुजरातमध्ये जन्माला आलेल्या औरंगजेबाला ज्या महाराष्ट्रानं मूठमाती दिली त्याची कबर तुम्ही उद्ध्वस्त करा आणि तो सोहळा कराल तेव्हा प्रमुख पाहुणे म्हणून नितीश कुमार, चंद्राबाबू नायडूंना बोलवा. सोपा विषय आहे. त्यात दंगल करण्याचं कारण काय?, असा सवाल माजी मुख्यमंत्र्यांनी विचारला. गृहमंत्र्यांचं घर नागपुरात येतं. आरएसएसचं मुख्यालय नागपुरात आहे. अशा नागपुरात हिंदू खतरे में कसा काय? मग इतकी वर्षे तुम्ही केलंत तरी काय? दंगल पूर्वनियोजित असेल तर मग फडणवीसांचं गृह खातं काय झोपा काढत होतं का? हा पूर्वनियोजित कट तुमच्या कानावर आला का नाही? आणि आला असेल तर तुम्ही त्याकडे दुर्लक्ष केलंत का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं फडणवीसांनी द्यावीत, असं ठाकरे म्हणाले.सरकार स्वत:चं अपयश लपवण्याचा प्रयत्न करतंय आणि ते करताना आणखी अपयशी ठरतंय. भाजपचं हिंदुत्व आम्ही पाहिलेलं नाही. त्यांना हिरव्या रंगाबद्दल इतका राग असेल तर तुमच्या झेंड्यावर असलेला हिरवा रंग आधी काढून दाखवा. भाजपनं आधी ते करावं आणि मग हिंदू मुस्लिम करावं. एका बाजूला हिंदुस्तान, पाकिस्तान करायचं आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्यासोबत क्रिकेट सामने दुबईत खेळायचे आणि त्या सामन्याला यांची पोरंटोरं जाणार. म्हणजे मंत्र्यांचा मुलगा म्हणजेच जय शहा सामना आयोजित करणार आणि इकडे गरिबांच्या मुलांना हिंदुस्तान पाकिस्तान करुन लढवणार, हे हिंदुत्व कोणतं?, असा प्रश्न ठाकरेंनी विचारला.

## हातात काठ्या आणि दगडं घेऊन वाहनांची तोडफोड, नागपुरातील हिंसाचाराचा अंगावर काटा आणणारा प्रसंग....



**नागपूर :** औरंगजेबाच्या कबरीवरून सुरू झालेल्या वादाचे तीव्र पडसाद नागपूरमध्ये उमटले आहेत. शहरातील महाल परिसरात मोठ्या प्रमाणावर हिंसाचार उफाळून आला आहे. काही समाजकंटकांनी रस्त्यावर उतरून वाहनांची तोडफोड केली, तर काही वाहनांना आग लावण्यात आली. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत ८० जणांना ताब्यात घेतले आहे आणि संपूर्ण भागात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

घटनेचे अनेक व्हिडीओ आणि छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या व्हिडिओमध्ये काही समाजकंटक हातात काठ्या आणि दगडं घेऊन वाहनांची तोडफोड करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. तसेच, काही गुन्हेगारांनी पेट्रोल बॉम्बचा वापर करत दुचाकींना आग लावल्याचेही समोर आले आहे. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिक भयभीत झाले आहेत.या हिंसाचारात अनेक वाहनांचे नुकसान झाले असून, काही दुकाने आणि घरांवरही हल्ला झाल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. काही नागरिकांना किरकोळ दुखापती झाल्याचे वृत्त आहे. जिल्हा प्रशासनाकडून नुकसानीची पाहणी सुरू असून, तोडफोड झालेल्या वाहनांचे आणि इतर मालमत्तेचे पंचनामे करण्यात येत आहेत. प्रशासनाने नुकसान भरपाई संदर्भात लवकरच निर्णय घेण्याचे संकेत दिले आहेत.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले. नागपूर पोलिसांनी परिसरात मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात केला असून पुढील कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी संचारबंदी लावण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूरचे पोलीस आयुक्तांनी याप्रकरणी कठोर कारवाईचे आश्वासन दिले आहे.या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर नागपूर प्रशासन आणि स्थानिक नेत्यांनी नागरिकांना संयम बाळगण्याचे आणि सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन केले आहे. सोशल मीडियावर कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही प्रशासनाने सांगितले आहे. सध्या पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली असली तरी, या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष पथक नेमण्यात आले आहे. नागपूरकरांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पत्नीचं मंगळसूत्र चोरलं, पतीकडून पाठलाग; चोरट्यांनी केलेल्या कृत्याने अकोला हादरलं...



**अकोला :** रविवारी रात्रीच्या सुमारास अकोला रेल्वे स्थानक परिसरातील अतिशय भयंकर घटना घडली. रेल्वे स्थानक परिसरातील एका हॉटेल समोर काही अज्ञात चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र पळवून नेलं. त्यावेळी महिलेच्या पतीने या चोरट्यांचा पाठलाग केला. मात्र पाठलाग करणाऱ्या करणाऱ्या महिलेच्या पतीवर चोरट्यांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. चोरट्यांचा पाठलाग करणाऱ्या महिलेच्या पतीवर त्यांनी दगडाने चेहऱ्यावर वार केले. यात अकोला शहरातील कौलखेड भागात राहणारे हेमंत गावंडे हे गंभीर जखमी झाले होते. जखमीवर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारा दरम्यान गावंडे यांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरु केला. त्यानंतर एका संशयित आरोपीचा फोटो पोलिसांनी जारी केला होता. त्याला एमआयडीसी परिसरातून स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे.अकोला रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक चारवर चोरट्याने हेमंत गावंडे यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोन्याचं मंगळसूत्र पळवलं. त्यानंतर हेमंत गावंडे यांनी या चोरट्याचा पाठलाग केला. मात्र या चोरट्याने पाठलाग करणाऱ्या हेमंत यांच्यावर हल्ला केला. त्यांचा चेहरा दगडाने ठेचण्यात आला. त्यानंतर जखमी अवस्थेत गावंडे यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.अज्ञात हल्लेखोराविरोधात रामदास पेठ पोलिसांत गुन्हा नोंदवला होता. पोलीस अज्ञात हल्लेखोराचा शोध घेत असतानाच सीसीटीव्ही फुटेजमधील एका संशयिताचा फोटो पोलिसांनी जारी केला होता. त्यानंतर याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली.दरम्यान, पुण्यातील बसस्थानक परिसरातील दुर्दैवी घटनेनंतर आता अकोला रेल्वे स्थानकावरील घटनेमुळे अकोला रेल्वे स्टेशन परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. रात्रीच्यावेळी प्रवास करावा की नाही असा प्रश्न प्रवाशांपुढे निर्माण झाला आहे. रेल्वे स्थानकावर आरपीएफ, जीआरपी असे दोन्ही विभागाचे पोलीस तैनात असताना अशी भीषण घटना घडल्याने अकोला हादरुन गेलंय. रेल्वे स्थानकावरील पोलीस नेमकी सुरक्षा तरी कुणाची करतात, प्रवासी सुरक्षित आहेत का असे प्रश्न या घटनेनंतर उपस्थित होत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अजिंक्य रहाणे आयपीएल २०२५ मध्ये रचणार इतिहास

## रोहित,विराट, धोनीसह कोणालाच ही गोष्ट जमली नाही...




**नवी दिल्ली :** मराठमोळा अजिंक्य रहाणे आता आयपीलच्या पहिल्याच सामन्यात इतिहास रचणार असल्याचे आता समोर आले आहे. अजिंक्य रहाणे जेव्हा २०२५ च्या मोसमासाठी मैदानात पाऊल ठेवेल तेव्हा त्याच्या नावावर एक मोठा रेकॉर्ड जमा होणार आहे. यंदा जेव्हा आयपीएलचा लिलाव झाला तेव्हा अजिंक्य रहाणेवर सुरुवातीला कोणीच बोली लावली नव्हती. पण त्यानंतर ज्या खेळाडूंवर कोणीही बोली लावली नाही त्यांचे नाव पुन्हा एकदा लिलावामध्ये घेण्यात आले. त्यावेळी अजिंक्य रहाणेची बेस प्राइज ही १.४० कोटी रुपये होते. त्यावेळी केकेआरच्या संघाने या बेस प्राइजच्या किंमतीत म्हणजेच दीड कोटी रुपये मोजत अजिंक्यला आपल्या ताफ्यात दाखल केले.अजिंक्य रहाणेच्या केकेआरमधील कर्णधारपदावरुन अफवा पसरल्याचे म्हटले जात होते. जेव्हा अजिंक्य केकेआरचा कर्णधार होणार असल्याचे वृत्त पसरले, तेव्हा कोणालाच यावर विश्वास बसला नव्हता. काही दिवसांपूर्वी केकेआरच्या कर्णधारपदी वेंकटेश अय्यरची निवड झाल्याचीअ अफवा पसरली होती. त्यामुळे अजिंक्य रहाणेचा गेम झाल्याचे म्हटले जात होते. पण ही अफवा निघाली आणि अजिंक्य रहाणेच केकेआरचा कर्णधार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.अजिंक्य रहाणे यंदाच्या आयपीएलमध्ये जेव्हा पहिल्याच सामन्यात मैदानात पाऊल ठेवेल, तेव्हा त्याच्या नावावर इतिहास लिहिला जाणार आहे. कारण आतापर्यंत रोहित शर्मा, विराट कोहली आणि महेंद्रसिंग धोनीसारख्या दिग्गजांनाही ही गोष्ट करता आलेली नाही. कारण अजिंक्य रहाणे हा असा कर्णधार ठरला आहे की, जो आयपीएलच्या इतिहासात तिसऱ्या संघाचे नेतृत्व करत आहे. यापूर्वी अजिंक्य रहाणेने राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व केले होते, हे सर्वांनाच माहिती आहे. पण अजिंक्यने रायझिंग पुणे सुपरजायंट्स संघाचेही नेतृत्व केले होते. आता अजिंक्य रहाणे हा केकेआरचे नेतृत्व करत असून तो आयपीएलमध्ये तिसऱ्या संघाचा कर्णधार ठरणार आहे.केकेआरने गेल्यावर्षी आयपीएलचे जेतेपद जिंकले होते. त्यामुळे यावर्षी अजिंक्यच्या नेतृत्वाखाली केकेआरचा संघ कशी कामगिरी करतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

# दोन चिमुकल्या लेकरांना सोडून आई निघून गेली, तिने स्वत:ला संपवल्याचा दावा



**जळगाव :** सतत दारू पिऊन घरी येवून मारहाण करणारा पती आणि सासरच्या मंडळींच्या जाचाला कंटाळून एका २२ वर्षीय विवाहितेने आपल्या राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केली आहे. दरम्यान, मुलीला गळफास देवून तिला ठार मारण्यात आले आहे, असा आरोप मयत विवाहितेच्या माहेरच्या नातेवाईकांनी केला आहे. आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात येवून अटक करण्यात यावी, अशीदेखील मागणी त्यांनी केली आहे. सोमवारी रात्री घरी कोणी नसताना २२ वर्षीय सोनी चव्हाण हिने घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. मात्र ही घटना सोनी चव्हाण यांच्या माहेरी कळल्यानंतर त्यांनी ही आत्महत्या नसून सोनी हिला पती आणि सासरच्या मंडळींनी मारून टाकले असल्याचा आरोप केला आहे. जळगाव तालुक्यातील धानवड येथे सोनी चव्हाण(वय २२) ही विवाहिता आपल्या पती आणि दोन मुलांसह वास्तव्याला होत्या. सोनी हिने सोमवारी १७ मार्चला रात्री १० वाजेच्या सुमारास घरी कुणीही नसताना राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केली. हा प्रकार उघडकीला आल्यानंतर विवाहितेच्या सासरकडील मंडळींनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ.आश्विन देवचे यांनी तपासून मयत घोषित केले. दरम्यान विवाहितेच्या आई आणि वडिलांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात धाव घेत आक्रोश केला.गेल्या तीन वर्षांपासून तिचे पती चेतन गजानन चव्हाण याला दारू पिण्याचे व्यसन आहे. त्यामुळे दारू पिऊन मारहाण करणे सुरूच होते. त्याच्या त्रासाला कंटाळून विवाहितेने यापूर्वी देखील विषारी औषध घेवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान आत्महत्या नसून तिला गळफास देवून ठार मारले आहे, असा आरोप मयत विवाहिता सोनी चव्हाण यांची आई अनिता विनोद जाधव यांनी केला आहे. अनिता जाधव या सोयगाव तालुक्यातील नांद्रा ताड या गावच्या आहेत.दरम्यान, आपल्याला मुलीला ठार मारणाच्या आरोप करत तिच्या पतीसह सासरच्या मंडळीं विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, त्यांना अटक करण्यात यावी, अशी मागणी मृतक महिलेच्या आई-वडिलांनी केली आहे. या घटनेबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत विवाहितेच्या पश्चात सात्विक (वय-३), प्रथमेश (वय-५) ही दोन मुलं, आई-वडील, एक भाऊ, लहान बहीण असा परिवार आहे.

# २०२४-२५ मध्ये अमिताभ बच्चन यांनी केली ३५० कोटींची कमाई, तब्बल इतक्या कोटींचा भरला कर...

**मुंबई:** बॉलिवूड कलाकारांच्या चित्रपटाची जितकी चर्चा होते तितकीच चर्चा त्यांच्या कमाईची देखील होते. काही मिनिटांसाठी कोट्यवधींचं मानधन घेणाऱ्या या सेलिब्रिटींना किती कर भरावा लागतो, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला नेहमीच पडत असतो. आता अमिताभ बच्चन यांच्या मानधनाची चर्चा सुरू आहे.बॉलिवूड सिनेइंडस्ट्रीचे शहनशाह अमिताभ बच्चन यांनी गेली अनेक दशकं इंडस्ट्रीवर राज्य केलं, अजूनही करतायत. वयाच्या ८२ व्या वर्षीही ते आगामी सिनेमाचं शूटिंग करत आहेत. त्यामुळं त्यांची नेमकी कमाई किती असा प्रश्न आता चाहते विचारत आहेत. काही रिपोर्ट्सनुसार आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये अमिताभ यांनी तब्बल ३५० कोटींची कमाई केली आहे. इतकी बक्कळ कमाई करणाऱ्या अमिताभ यांनी सरकारच्या तिजोरीतही भर घातली आहे.ते सगळ्यात जास्त कर भरणाऱ्या सेलिब्रिटींच्या यादीत सामिल झाले आहेत.काही रिपोर्ट्सनुसार बॉलिवूडच्या या महानायकानं आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ३५० कोटींची कमाई केली आहे. बिग बजेट चित्रपट असो किंवा मग ब्रँड्स प्रमोशन... अमिताभ यांनाच पहिली पंसती असल्याचं दिसून येत आहे. त्यामुळं फक्त सिनेमेच नाही तर इतक माध्यमातूनही अमिताभ यांची मोठी कमाई होताना दिसतेय.तर कौन बनेगा करोडपती या शोसाठीही अमिताभ बच्चन मोठं मानधन घेत असतात. सिनेमे, टीव्ही शो, जाहिराती...अशा वेगवेगळ्या माध्यमातून अमिताभ यांनी ३५० कोटी कमावले आहेत. तर इतक्या मोठ्या कमाईनंतर आता त्यांना मोठा टॅक्सही भरावा लागणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार अमिताभ यांनी ॲडव्हान्स टॅक्सचा पहिला हप्ता भरला असून हा ५२.५० कोटींचा आहे.





१५ मार्च रोजी त्यांनी हा कर भरल्याचं म्हटलं जात आहे. तर अमिताभ यांना एकूण १२० कोटींचा कर सरकारला द्यावा लागणार आहे. २०२३-२४ मध्ये अमिताभ यांनी तब्बल ७१ कोटींचा टॅक्स भरला होता.कामाबद्दल बोलायचं झालं तर, कौन बनेगा करोडपतीचा १६ सीझन नुकताच संपला आहे. पण १७ व्या सीझनमधून ते पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. तर दुसरीकडे त्यांच्या सिनेमांचीही चर्चा सुरू आहे. गेल्या वर्षी आलेल्या कल्की २९८९ एडी या सिनेमात ते दिसले होते. या सिनेमाच्या दुसऱ्या भागातही अमिताभ दिसणार आहेत.

## स्टेशनरीच्या दुकानात काम केलं, वडील टेम्पो चालक

# हलाखीच्या परिस्थितीतून इंडियासाठी डेब्यू अन् नंतर ड्रोप; आता थेट मध्ये कमबॅक....

**मुंबई:** चेतन साकारिया आयपीएल २०२५ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सकडून खेळणार आहे. उमरान मलिकच्या जागी त्याला संघात समाविष्ट करण्यात आले आहे. दुखापतीमुळे मलिक या हंगामात खेळू शकणार नाही. साकारियाला केकेआरने ७५ लाख रुपयांना खरेदी केले आहे. एकेकाळी जगभरात प्रसिद्धी मिळवणारा साकारिया आता पुन्हा एकदा आयपीएल खेळताना दिसणार आहे. साकारियाचा इथपर्यंत पोहोचण्याचा प्रवास आव्हानांनी भरलेला आहे. आयपीएल २०२५ साठी, केकेआरने उमरान मलिकच्या जागी चेतन साकारियाला संघात घेतले आहे. उमरान मलिक दुखापतीमुळे संपूर्ण हंगामाबाहेर आहे. केकेआरने गेल्या वर्षीही साकारियाला खरेदी केले होते, पण त्याला खेळण्याची संधी मिळाली नाही. या वर्षीच्या लिलावात साकारियाला कोणताही खरेदीदार मिळाला नाही. आता त्याला



केकेआरमध्ये बदली खेळाडू म्हणून स्थान मिळाले आहे. केकेआरने त्याला ७५ लाख रुपयांना करारबद्ध केले आहे.चेतन शालेय जीवनात क्रिकेटचा खर्च भागविण्यासाठी त्याच्या मामाच्या स्टेशनरीच्या दुकानात काम करत असे. त्याच्या वडिलांना क्रिकेटचे साहित्य आणि प्रशिक्षण शुल्क परवडत नव्हते. २०२१ मध्ये त्याच्या धाकट्या भावाने आत्महत्या केली. चेतन आणि त्याच्या कुटुंबाला हे दु:ख सहन करावे लागले. चेतनला पहिल्यांदा २०२१ च्या आयपीएल मिनी-लिलावात १.२ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले होते. गुजरातमधील भावनगरपासून १० किलोमीटर अंतरावर असलेल्या एका गावातून येणाऱ्या साकारियासाठी जीवन सोपे नव्हते. त्याचे शिक्षण, क्रिकेटच्या वस्तू आणि क्रिकेट अकादमीतील प्रशिक्षणाचा खर्च त्याच्या मामाने उचलला. साकारियाचे वडील टेम्पो चालवायचे आणि त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचे.सौराष्ट्रच्या वरिष्ठ संघाकडून नेटमध्ये गोलंदाजी केल्यानंतर, त्याने नोव्हेंबर २०१८ मध्ये गुजरातविरुद्ध रणजी ट्रॉफीमध्ये पदार्पण केले. त्याने पहिल्या डावात ५ विकेट्स घेतल्या आणि सौराष्ट्रने पहिल्या डावात सामना जिंकला. त्याने त्याच्या पदार्पणाच्या रणजी हंगामात ८ सामन्यात २९ विकेट्स घेतल्या. टी-२० फॉर्मेटमधील त्याच्या गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. २०१९-२० च्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी दरम्यान, त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू स्काउट्सना प्रभावित केले. २०२१ मध्येच साकारियाने भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने एका एकदिवसीय सामन्यात २ बळी घेतले आहेत, तर २ टी सामन्यात १ बळी घेतला आहे.चेतन सकारियाने आतापर्यंत तीन आयपीएल हंगामात (२०२१-२३) १९ सामने खेळले आहेत. त्याने ८.४३ च्या इकॉनॉमीने २० विकेट्स घेतल्या आहेत. साकारियाने राजस्थान रॉयल्सकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले. २०२२ मध्ये तो दिल्ली कॅपिटल्सकडून खेळला. टी-२० क्रिकेटमध्ये, सकारियाने ४६ सामन्यांमध्ये ७.६९ च्या इकॉनॉमीने ६५ विकेट्स घेतल्या आहेत.

# सोन्याचे दर गगनाला भिडले, दुकानांमध्ये तोबा गर्दी; ज्वेलर्सची अडचण वाढली, भलतीच पंचाईत....

**नवी दिल्ली:** सोन्याचे भाव खूप वाढले आहेत. सोमवारी सोन्याच्या भावात मोठी वाढ झाली. भावात तब्बल १३०० रुपयांची वाढ झाली. त्यामुळे २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम ९०,७५० रुपये झाला. ९९.५% शुद्ध सोन्याचा भाव पण वाढला. तो १३०० रुपयांनी वाढून ९०,३५० रुपये प्रति १० ग्रॅम झाला. सोन्याचे भाव वाढल्यामुळे ते आता गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांच्या आवाक्याबाहेर जात आहे. याचा परिणाम सराफा बाजारात दिसून येत आहे. सोनं महाग झाल्यामुळे ग्राहक ज्वेलर्सकडे कमी येत आहेत. खरेदीसाठी लोकांची गर्दी कमी झाली आहे. एका सराफा व्यापाऱ्याने सांगितले की, ङ्कगेल्या महिन्यापासून सोन्याच्या दागिन्यांची विक्री खूप घटली आहे. लग्नसराईच्या काळातही सोन्याच्या दागिन्यांची जास्त विक्री झाली नाही.ङ्घ आणखी एका सराफा व्यापाऱ्याने सांगितले की, ङ्कसोन्याचे दागिने खरेदी करणारे कमी झाले आहेत आणि विकायला येणारे जास्त आहेत.ङ्घ याचं मुख्य कारण म्हणजे सोन्याच्या भावात झालेली वाढ.मध्यमवर्गीय लोकांचा दागिने बनवण्यात मोठा वाटा असतो. (अहमदाबाद) ने २०२२ मध्ये एक सर्वे केला होता. त्यानुसार ज्या लोकांचे वार्षिक उत्पन्न २ ते १० लाख रुपये आहे, ते लोक जास्त सोनं खरेदी करतात. एकूण सोन्याच्या विक्रीमध्ये यांचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा जास्त असतो. सोनं महाग झाल्यामुळे सर्वात जास्त फटका गरीब आणि मध्यमवर्गाला बसला आहे. मध्यमवर्ग नेहमी सोनं खरेदी करण्यात पुढे असतो. पण भाव वाढल्यामुळे आता त्यांनी माघार घेतली आहे. काही ज्वेलर्सनी सांगितले की, त्यांच्या दुकानात येणाऱ्या ग्राहकांमध्ये मध्यमवर्गातील लोकांची संख्या जास्त असते. सोनं महाग झाल्यामुळे आता खूप कमी ग्राहक येत आहेत.सोन्याची खरेदी कमी झाल्यामुळे ज्वेलर्सचा धंदा मंदावला आहे. ज्वेलर्सच्या मते, लग्नसराईत सुद्धा सोन्याची जास्त विक्री झाली नाही. १८ कॅरेट सोन्याला जास्त मागणी होती. पण २२ कॅरेट सोनं कमी प्रमाणात विकले गेले.उदाहरणार्थ, एका ग्राहकाला २४ कॅरेटचे १० ग्रॅम सोन्याचे दागिने घ्यायचे होते. पण सोनं महाग असल्यामुळे त्याने २४ कॅरेट ऐवजी २२ कॅरेट किंवा १८ कॅरेट सोनं घेणे पसंत केले. जर कुणी २४ कॅरेट सोनं घेतलं, तर ते कमी प्रमाणात घेतलं. ज्वेलर्सना आशा आहे की, लवकरच सोन्याच्या भावात थोडी घट होईल.जाणकारांच्या मते, ट्रेड



वॉर, डॉलरची कमजोरी आणि महागाईमुळे सोन्याच्या भावात वाढ होत आहे. त्याचबरोबर सोन्याच्या आयातीवर टॅक्स लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याची मागणी वाढली आहे. सोनं हे सुरक्षित गुंतवणूक मानलं जातं. जगातील सेंट्रल बँक सोनं खरेदी करत आहेत. मागील तीन वर्षात त्यांनी मागील सहा वर्षपेक्षा जास्त सोनं खरेदी केले आहे. गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंड मध्ये वाढ झाल्यामुळे सोन्याच्या किमती वाढल्या आहेत. सोन्याच्या भावात वाढ होण्याची अनेक कारणं आहेत. जसं की, दोन देशांमध्ये व्यापार युद्ध चालू असेल, तर लोक सोनं खरेदी करतात. कारण सोनं एक सुरक्षित गुंतवणूक आहे. त्याचप्रमाणे डॉलर कमजोर झाला, तर सोन्याचे भाव वाढतात. महागाई वाढली, तरी लोक सोनं खरेदी करतात. कारण महागाईच्या काळात सोन्याचे भाव वाढत असतात.

# सहकार क्षेत्रातला मोठा चेहरा भाजपच्या गोटात, माजी आमदाराचा भव्य पक्षप्रवेश...

**परभणी :** नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून परभणी जिल्ह्यातील गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवलेले माजी आमदार सिताराम घनदाट आणि पाथरी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवलेले इंजिनिअर सुरेश फड या दोघांनीही वंचित बहुजन आघाडीला रामराम ठोकला आहे. भाजप प्रदेश कार्यालयात कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत दोघांनीही भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीला चांगलाच झटका बसला आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दोघांचा प्रवेश भारतीय जनता पक्षाला चांगलेच बळ मिळवून देणारा ठरणार आहे.विधानसभा निवडणुकीपूर्वी माजी आमदार सिताराम घनदाट यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला होता. सिताराम घनदाट यांनी गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व केले आहे. मतदारसंघात त्यांचे कार्यकर्त्यांचे मोठे जाळे आहे. सिताराम घनदाट हे अभ्युदय बँकेचे माजी अध्यक्षही आहेत. सहकार क्षेत्रात त्यांचे चांगले काम असल्याने त्यांची परभणी जिल्ह्यात मोठी ताकद आहे.२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्याचा शब्द दिला होता, त्यामुळे माजी आमदार सिताराम घनदाट यांनी निवडणुकीची तयारी देखील केली होती, पण ऐनवेळी हा विधानसभा मतदारसंघ शिवसेनेला सुटला आणि त्यामुळे त्यांनी नाराज होऊन वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश केला.तीन महिन्यापूर्वी त्यांनी वंचित बहुजन आघाडीचा झेंडा हाती धरला आणि विधानसभा निवडणुकीत त्यांना तीन नंबरची मते मिळाली. त्यामुळे सिताराम घनदाट यांच्या भाजप प्रवेशाने गंगाखेड विधानसभा मतदारसंघात पक्षाची ताकद वाढणार हे निश्चित मानले जात आहे.

दुसरीकडे, पाथरी विधानसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक लढलेल्या सुरेश फड यांनी देखील आज भाजपामध्ये प्रवेश केला आहे. मागील काही वर्षापासून इंजिनिअर सुरेश फड



वंचित बहुजन आघाडीमध्ये सक्रिय होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून तिकीट मिळेल, अशी त्यांना अपेक्षा होती. तशी परभणी लोकसभा मतदारसंघात त्यांनी पक्षबांधणी देखील केली होती. पण लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून त्यांना तिकीट मिळाले नाही. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी वंचित बहुजन आघाडीकडून पाथरी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली. पण त्यांचा पराभव झाला. इंजिनीयर सुरेश फड यांनी देखील आज कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे.

माजी आमदार सिताराम घनदाट व इंजिनिअर सुरेश फळ या दोघांच्या भाजपा प्रवेशामुळे जिल्ह्यात भाजपची ताकद चांगलीच वाढणार आहे. तर वंचित बहुजन आघाडीला मात्र चांगलेच मोठे खिंडार पडले आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महायुतीतील तीनही पक्ष मोठ्या प्रमाणावर प्रवेश करून घेत आहेत. काही दिवसांपूर्वी परभणीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये देखील असाच पक्षप्रवेश सोहळा झाला होता.

# ठाकरे मोदींना जाऊन भेटले, म्हणाले युती करायचीय, पण...; विधिमंडळात शिंदेंचा मोठा गौप्यस्फोट..

**मुंबई:** विधिमंडळाच्या अधिवेशनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना उबाठाचे आमदार अनिल परब यांच्यात तुफान जुंपली. नोटिस आले म्हणून तिकडे गेले, असा आरोप परब यांनी केला. त्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे प्रचंड आक्रमक झालेले पाहायला मिळाले. परब साहेब तुमचा इतिहास मला माहित आहे. मला सगळं माहीत आहे. त्यामुळे मला अधिक बोलायला लावू नका, असा इशाराच त्यांनी दिला. आम्ही अडीच वर्षात केलेल्या कामामुळे पुन्हा आलो. तुमचं तर विरोधी पक्षनेतेपद गेलं. मला एक अंदर की बातमी सांगायची आहे. यांचे प्रमुख मोदी साहेबांना जाऊन भेटले. मला माफ करा म्हणाले. आम्ही पुन्हा तुमच्याकडे येतो म्हणाले. पण इकडे येऊन पलटी मारली. तुम्ही पण (परबांना उद्देशून) गेला होतात. तुम्हाला जेव्हा नोटिस आली, तेव्हा तुम्ही गेला होतात. तुम्ही म्हणालात, मला यातून सोडवा. पण



सुटल्यावर तुम्ही पलटी मारली. आम्ही केलं ते खुलेआम केलं. आम्ही लपूनछपून गेलो नाही. शिवसेना धोक्यात आली, बाळासाहेबांचे विचार, हिंदुत्व धोक्यात आलं तेव्हा तुमचं सरकार पलटी केलं. हे करायला वाघाचं काळीज लागतं. लांडगा वाघाचं कातडं पांघरुन वाघ होत नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री शिंदे बरसले. परब साहेब तुमचा इतिहास मला माहीत आहे. मला सगळं माहीत आहे. अंडीपिल्ली माहीत आहेत. कोण कशासाठी कुठे गेलं, याची कल्पना मला आहे. मी जे केलं, ते खुलेआम केलं. मी तुमच्या पक्षप्रमुखांना सांगितलं होतं की शिवसेना, भाजप युती करा. तेव्हा काय मी मुख्यमंत्री होणार होतो? तरीही पाच वेळा त्यांना सांगितलं होतं. पण मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीचा इतका मोह का झाला? बाळासाहेबांनी सांगितलं होतं जाऊ नका काँग्रेससोबत. का गेलात? आम्ही तर सत्ता सोडली, मंत्रिपदं सोडून गेलो. पुढे काय होणार याची कल्पना नव्हती, तरीही ८ जणांनी मंत्रिपदं सोडली, अशा शब्दांत शिंदेंनी ठाकरेसेनेला लक्ष्य केलं.तुम्ही २०१९ मध्ये काँग्रेससोबत जाऊन सत्ता मिळवली. बाळासाहेबांचे विचार सोडून औरंगजेबाचे विचार स्वीकारले. तुम्हाला हिंदुत्वावर बोलायचा अधिकार काय? हे (परब) गेले होते तिकडे, लोटांगण घालून आले, म्हणाले मला वाचवा, मला वाचवा आणि मग इथे येऊन पलटी मारली. यांचे प्रमुख पण तिकडे गेले आणि आम्ही युती सरकार स्थापन करु म्हणाले. इकडे आल्यावर पलटी मारली. भाजपचे देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन, प्रवीण दरेकर, आशिष शेलार या चार जणांना तुरुंगात टाकणार होते. त्यांना तुरुंगात टाकून भाजपचे आमदार फोडून त्यांना महाविकास आघाडीत घेणार होते. मी यांचा डाव हाणून पाडला. यांचा टांगा पलटी केला आणि महायुतीचं सरकार आणलं, असं म्हणत शिंदे ठाकरेसेनेवर तुटून पडले.सत्तेसाठी लाचार झाले. सत्ता मिळवण्यासाठी काँग्रेससोबत गेले. शिवरायांचे विचार सोडले. एकनाथ शिंदेनं धाडस करुन शिवसेना वाचवली, धनुष्यबाण वाचवला. त्यामुळेच ८० जागा लढवून आम्ही ५७ जागा जिंकल्या. तुम्हाला १०० जागा लढवून फक्त २० मिळाल्या. जनतेनं तुम्हाला धडा शिकवला. लोकसभेच्या निवडणुकीत याकूब मेमनची कबर सजवली, पाकिस्तानचे झेंडे नाचवले. तुम्हाला लाज वाटली पाहिजे, अशी घणाघाती टीका शिंदेंनी केली.

# ग्रंथोत्सवाचा उत्साहात शुभारंभ ; ग्रंथदिंडी, परिसंवादाद्वारे वाचन संस्कृतीचा जागर...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचा मोठ्या उत्साहात शुभारंभ करण्यात आला. शहरातील गर्दे वाचनालयाच्या सभागृह येथे आयोजित या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन साहित्यिक अर्चना देव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. राजेश पाटील यांच्या हस्ते मंगळवारी झाले. यावेळी शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, बाबासाहेब वरणगावकर, उदय देशपांडे, डॉ. किं.वा.वाघ, डॉ. राजेंद्र गणगे, नेमिनाथ सातपुते, अनंत सातव, विष्णू इंगळे, उमेश ढगे यांच्यासह जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी शालेय विद्यार्थी उपस्थित होते. या ग्रंथोत्सवासाठी उपस्थित झालेल्या मान्यवरांनी मनोगत केले. यात त्यांनी आधुनिकतेच्या दिशेने वाटचाल करतांना ग्रंथ, पुस्तक वाचन संस्कृती जोपासण्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. ग्रंथोत्सवाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपूजन करुन शहरातील हुतात्मा स्मारकापासून ते गर्दे वाचनालयापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात आली. या ग्रंथदिंडीचे उद्घाटन साहित्यिक अर्चना देव यांच्या हस्ते सकाळी करण्यात आले. या ग्रंथदिंडीत महिला, शाळकरी विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी, सहभागी झाले होते. या ग्रंथदिंडीत कीर्तन, पारंपरिक फुगडी खेळांचे सादरीकरण करण्यात आले. यासह सहभागी महिलांनी फुगडीचा देखील आनंद घेतला. हा ग्रथोत्सव दि. १८ व १९ मार्चपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या ग्रंथोत्सवात वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी ग्रंथप्रदर्शन, ग्रंथविक्री, कविसंमेलन, व्याख्याने, तसेच विविध बहुरंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून वाचनप्रेमी, पुस्तकप्रेमींनी ग्रंथोत्सवात सहभागी होवून लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अभिजात मराठी भाषा आणि आपली जबाबदारी या विषयावर आधारित परिसंवाद देखील आयोजित करण्यात आले. यात डॉ. एस. एम.कानडजे यांनी व्याख्यानाद्वारे मराठी भाषेचे महत्व विषद केले. या परिसंवादामध्ये डॉ. किं. वा. वाघ, सुनिल वायाळ, नेमिनाथ सातपुते सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.निशिकांत ढवळे यांनी तर आभार प्रदर्शन गजानन कुरवाडे यांनी केले. या ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दि. १९ मार्च रोजी सकाळच्या सत्रात कृत्रीम बुद्धीमत्तेचा वाचन संस्कृतीवर होणारा परिणाम, वाचन चळवळीमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान या विषयावर परिसंवाद तर दुपारच्या सत्रात कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर या दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचा समारोप कार्यक्रम होईल. या ग्रंथोत्सवात नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन ग्रंथोत्सव जिल्हा समन्वय समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सोशल फोरमने मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीसांना ह्या केल्या मागण्या!



जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सोशल फोरम च्या वतीने बुधवार १८ मार्च रोजी सोशल फोरमचे संस्थापक तसेच शिवसेना नेते विजय अंभोरे यांनी अनुसूचित जातीतील आरक्षणाचे अ, ब, क, ड उपवर्गीकरण तसेच इतर मागण्यांबाबत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. यावेळी त्यांनी दिलेल्या निवेदनात अनुसूचित जातीतील आरक्षणाचे अ, ब, क, ड उपवर्गीकरण करणे , क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या सरकारने स्वीकारलेल्या शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करणे, १ ऑगस्ट २०२४ च्या सर्वो च्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जातीतील आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचे अधिकार राज्य सरकार यांना असल्याचा सर्वो च्च निकाल दिला. त्यानुसार आपल्या सरकारने सेवानिवृत्त न्यायमुर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती दि. १५ आक्टों २०२४ रोजी गठीत केली आहे. या बदर समितीने दोन महिन्यात अहवाल सादर करावा. (मुदतवाढ दिली असली तरी), आरक्षण उपवर्गीकरण होत नाही तो पर्यंत जून मध्ये होणारी नोकर भरती सरकारने करू नये किंवा त्यास स्थगित द्यावी., माजी न्यायमूर्ती बदर समितीने अनुसूचित जातीतील ५९ जातींची आजची लोकसंख्या गृहीत धरून वर्गीकरण करावे, २० वर्ष झाली तरी सरकारने स्वीकारलेल्या ६८ शिफारशीपैकी एकाही शिफारशींची अंमलबजावणी केली नाही म्हणून सरकारने बजेटसह तरतुद करून या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व खात्याना परिपत्रक काढले पाहिजे. २० एप्रिल २०२५ पर्यंत वरील मागण्यांची अंमलबजावणी झाली नाही तर सकल मातंग समाज रस्त्यावर उतरून आपल्या न्याय हक्कासाठी लाखोंच्या संख्येने २० मे २०२५ रोजी आझाद मैदानावर येऊन आक्रमक आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही याची दखल म्हणून सरकारने लवकर निर्णय घ्यावा असे सुद्धा निवेदनात नमूद केले आहे.

यावेळी सोशल फोरमचे प्रदेश कार्याध्यक्ष सोपानराव पानपाटील, जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण शिंदे, ओम प्रकाश नाटेकर, विलास सोनोने, गजानन गायकवाड, मधुकर गायकवाड, सौ. नंदाताई कडूबा मोरे, सौ. संगीता ताई निकाळजे, रामेश्वर जाधव, संभाजी निकाळजे, विकी आव्हाड, गणेश गायकवाड, आणि इतर असंख्य कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# पत्नीला मारहाण पाच जणांवर गुन्हा

जनसंचलन/ खामगाव

पत्नीला शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी लुबना शिरीन अखलाक बेग (वय ३१, रा. ग्रीन पार्क कॉलनी, चाळीसगाव रोड, भडगाव) यांनी शिवाजीनगर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, आरोपी अखलाक बेग अनवर बेग मिर्झा (३५), अनवर बेग करीम बेग मिर्झा (६४, सासरा), रोनक आरा अनवर बेग मिर्झा (५६, सासू), जेठ आफताब मिर्झा अनवर मिर्झा (४०, जेठ) आणि नणंद रूक्सार आरा इम्रान शेख (३१) (सर्व रा. ग्रीन पार्क कॉलनी, चाळीसगाव रोड, भडगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. २१ जून २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच तिच्या आई, काका व मामास देखील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपींनी फिर्यादी व तिच्या मुलाला वस्त्रहरण करून घराबाहेर हाकलून दिले आणि शारीरिक छळ केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# जळगाव जामोद येथे २५ लाखांच्या गुटख्यासह तीन आरोपी अटकेत

जनसंचलन/ जळगाव जामोद



जिल्ह्यातील अवैध गुटखा व्यवसायावर कारवाईचा बडगा उगारत जळगाव जामोद पोलिसांनी २५ लाख ४२ हजार २५० रुपयांच्या गुटख्यासह तीन आरोपींना अटक केली. ही कारवाई अप्पर पोलिस अधीक्षक आयपीएस डॉ. श्रेनिक लोढा यांच्या विशेष पथकाने केली. सुनगाव गावातून जामोदकडे जाणाऱ्या मार्गावर १५ मार्च रोजी संध्याकाळच्या सुमारास पोलिसांनी नाकाबंदी करून संशयित मालवाहू क्रमांक (एचएच-३० बीडी- ५५४६) अडवले. झडती घेतल्यावर वाहनात मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित तंबाखू साठा आढळून आला. एकूण २५ लाख ४२ हजार २५० रुपयांचा गुटखा आणि ९ लाख रुपयांचे वाहन असा ३४ लाख ४२ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी अन्नसुरक्षा अधिकारी गुलाबसिंग कीर्ता वसावे यांच्या फिर्यादीवरून शुभम भटे (२४, लाडणापूर, ता. संग्रामपूर), राहुल जयस्वाल (३४, शिरसोली, ता. तेल्हारा), आणि प्रवीण मुर्ख (२३, लाडणापूर) या तिघांविरुद्ध भारतीय दंड संहिता आणि अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीनही आरोपींना १८ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पुढील तपास जळगाव जामोद पोलिस करीत आहेत

पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार

हॅलो बुलडाणा

सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल

वेब साईड & पोर्टल चॅनल

वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर

कुठली ही बातमी निशुल्क

***

दैनिक निडर निर्भिड

जनसंचलन

काही तक्रार असल्यास संपर्क

शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040

पिन 443001

# ठाणेदार नवलकरांना अवैध धंद्याचे कसले नवल?

**जनसंचलन/बुलढाणा**

सध्या बोराखेडी पोलीस ठाण्याचे ठाणेदार नवलकर असले तरी त्यांना बोराखेडी पोलीस ठाणे हद्दीतील व मोताळा शहरातील अवैध धंद्याचे अजिबात नवल वाटत नाहीये! पोलिसांच्या हप्तेखोरीच्या सवयीमुळे राजरोसपणे येथे अवैध धंदे जोमात तर पोलीस प्रशासन कोमात असे चित्र आहे. दरम्यान पवित्र रमजान महिन्यात कायदा व सुव्यवस्था राखल्या जावी म्हणून शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक शेख साजिद शेख सुपडू व नागरिकांनी एसपींना निवेदनातून अवैध धंदे बंद करण्याची मागणी केली आहे. बोराखडी पोलीस हद्दीत व मोताळा शहरात वरली, मटका, जुगार पोलिसांच्या आशीर्वादाने बिनधास्त खेळल्या जातो. अवैध दारू वाहतूक सुरू असून दारू विक्रीला उधाण आले आहे.सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू आहे.पुढे काही दिवसात रमजान ईद साजरी होईल.या पार्श्वभूमीवर अवैध धंद्यामुळे कायदा व सुव्यवस्था धोक्यात



येण्याची शक्यता असून शांतता भंग होऊ शकते.त्यामुळे बोराखेडी पोलीस हद्दीतील वाढलेले सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावे अन्यथा आंदोलनाचा पवित्रा घेतला जाईल, असे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनादेण्यात आले आहे.या निवेदनावर नगरसेवक शेख साजिद शेख सुपडू, जुनेद शहा गफ्फार शहा,सय्यद लुक्मान सय्यद लाल,सय्यद अख्तर सय्यद सत्तार,आवेद शहा सरदार शहा यांची स्वाक्षरी आहे.

# कर्जदाराची फसवणूक दोघांविरुद्ध गुन्हा

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव शेगाव येथील अग्रसेन सहकारी पतसंस्थेच्या खामगाव शाखेतील व्यवस्थापकांनी कर्जदाराच्या विश्वासाला तडा देत, कोरे धनादेश गैरप्रकाराने वापरल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दोन आरोपींवर फसवणुकीसह विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोपाल बाबुलाल अग्रवाल (व्यवसाय व्यापारी, रा. डॉ. गायकवाड हॉस्पिटलजवळ, खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून सुरेश शामसुंदर गाडोदिया (मुख्य व्यवस्थापक, रा. शेगाव) आणि अनंत गजानन रंगदळे (व्यवस्थापक, रा. खामगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सफाई कामगार युनियनचे साखळी उपोषण सुरू

**जनसंचलन/ शेगाव**

नगरपरिषदेत सेवानिवृत्त झालेल्या २४ सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड कमिटीच्या शिफारशींनुसार वारसा हक्काची नोकरी मिळावी, या मागणीसाठी सफाई कामगार युनियनने १७मार्चपासून नगरपालिकेसमोर साखळी उपोषण सुरू केले आहे. लाड कमिटीच्या शासन निर्णयानुसार वारसदारांनी नोकरीसाठी अर्ज केले असून, अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटनेने वारंवार पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही कोणतीही कार्यवाही झाली नाही. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाने शासनाला या प्रकरणात तातडीने न्याय देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांमार्फत प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. नगरपालिकेने त्वरित कार्यवाही करून २४ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी अखिल भारतीय मजदूर काँग्रेस युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष चरणसिंग टाक, राष्ट्रीय सदस्य राहुल टाक, प्रदेश निरीक्षक ललित टाक, प्रदेशाध्यक्ष लोकेश सारवान यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

# तुपकरांचे आंदोलन; कार्यकर्ते ठाण्यात स्थानबद्ध...

## सिंदखेड राजा तहसील कार्यालयात फेकले सोयाबीन

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाचा धसका घेऊन पोलिसांनी शहरातून मुंबईकडे जाणाऱ्या अनेक शेतकरी, कार्यकर्त्यांना स्थानिक पोलिस ठाण्यात स्थानबद्ध केले आहे. या कारवाईचा निषेध करीत शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयात सोयाबीन फेकले विधानसभा निवडणुकीपूर्वी रविकांत तुपकर यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्या घेऊन सिंदखेडराजा येथील जिजाऊ राजवाड्यासमोर चार दिवस अन्नत्याग आंदोलन केले होते. उपोषण सोडताना सरकारने तुपकर यांना शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणार असल्याचे आश्वासन दिले होते. मात्र, सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले नाही. त्याचसोबत पीक विमा लाभअजनही शेतकऱ्यांना मिळालेला नाही शेतकरी संघटना आंदोलनावर ठाम असून अनेक जण मुंबईसाठी रवाना झाले सोयाबीन, कापूस व अन्य पिकांना हमी भाव देण्यासंदर्भातदेखील सरकारने



सकारात्मकता दाखवली होती. मात्र, अद्याप सरकारने यासंदर्भातील एकही प्रश्न सोडविला नसल्याने तुपकर मुंबई येथे अरबी समुद्रात सोयाबीन बुडवून आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून शहरासह तालुक्यातील अनेक शेतकरी मंगळवारी मुंबईकडे रवाना झाले आहेत

# चिखलीत आज अन्नत्याग आंदोलन

**जनसंचलन/ चिखली**

शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण गंभीर समस्या बनले असून, शासनाने तातडीने पावले उचलावीत, या मागणीसाठी १९ मार्च रोजी चिखली येथे अन्नत्याग आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. १९ मार्च १९८६ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील शेतकरी साहेबराव पाटील करपे यांनी कुटुंबासह पवनार आश्रमात आत्महत्या केली होती. या घटनेला ३९ वर्षे पूर्ण झाली तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या अद्याप थांबलेल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर, अन्नत्याग आंदोलन केले जात आहे. १९ मार्च रोजी राज्यभर असे आंदोलन केले जाते. चिखलीतही शेतकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते यावर्षीही आंदोलन करणार आहेत. हे आंदोलन सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर होणार असून, पूर्णतः सामाजिक हेतूने आयोजित करण्यात आले आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाशी संलग्न नसून, शेतकऱ्यांप्रति संवेदना व्यक्त करण्यासाठी सर्व नागरिकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन देविदास कणखर, डॉ. सत्येंद्र भुसारी, कैलास गाडेकर, उद्धव थुट्टे, संतोष काळे, शंतनू पाटील, सुभाष देव्हडे, विनायक सरनाईक आणि डॉ. शिवशंकर खेडेकर यांनी केले आहे.

# आ.संजय गायकवाड यांचे थेट आव्हान औरंगजेबाची कबर देशाबाहेर फेका!



**जनसंचलन/बुलढाणा**

औरंगजेब हा हिंदुस्थानचा आणि भारताचा शत्रू होता. त्याने लाखो हिंदूंची कत्तल केली, मंदिरे उद्ध्वस्त केली आणि हिंदूंवर अमानुष जुलूम केले. अशा क्रूर अत्याचारी बादशहाची कबर महाराष्ट्राच्या मातीत असण्याचा कोणताही अधिकार नाही! ती तात्काळ उखडून फेकली पाहिजे, अशी आक्रमक मागणी बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी केली आहे. गायकवाड म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदवी स्वराज्यासाठी लढणाऱ्या लाखो वीरांच्या भूमीत औरंगजेबाची कबर असणे हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान आहे. हा अत्याचारी बादशहा देशाचा वैरी होता, मग त्याची कबर इथे का ठेवायची? ती देशाच्या बाहेर फेकून द्यायलाच हवी! त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण तापण्याची शक्यता असून, हिंदुत्ववादी संघटनांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958